The Hitavada
NAGPUR ■ Sunday ■ January 3 ■ 2021

# Short term training session held in IPER

■ District Correspondent
WARDHA, Jan 2

INSTITUTE of Pharmaceutical Education and Research, Wardha run by Vidardha Youth Welfare Society, Amravati, conducted AICTE sponsored online short term training programme for teachers on the theme 'Outcome-based Pedagogical Methods for Effective Teaching, Learning and Accreditation'.

The programme was inaugurated by Dr Nitin R Dhande, President of the Society. The chief guest for inaugural programme was Dr Rajendra Kakde, Advisor, AICTE, New Delhi. Dr M P Puranik, Convenor of the programme, told the delegates about the programme while Dr R O Ganijiwale, incharge Principal of IPER, enlightened the delegates on the essence of STTP.

The STTP was spread over four slots each of one week during which 40 academicians and scientist from across India guided the participants.

Dr N K Jain, ex-Professor and HoD, Pharmaceutical Sciences, Dean and Acting Vice-Chancellor, Dr H S Gour University, Sagar, Dr Sanjay Jachak, HoD, NIPER, Mohali, Dr Raghurama Rao, Professor, Kakatiya University, Warangal, Dr B N Sinha, Professor, BIT, Ranchi, Dr Nazma Inamdar, Professor, Government College of Pharmacy, Amravati, were some of the delegates, to name a few.

For every slot more than 100 delegates were registered. The plenary lectures were moderated by Dr Manisha Puranik, Dr Shagufta Khan, Dr L G Rathi, Dr Dilesh Singhavi, Dr Nilesh Karande, Dr Bhushan Kumar Gandhare, S P Dewani, Abhiram Deshmukh amd Sadhna Gautam.

The technical team including S P Dewani, Abhiram Deshmukh, Jyotiranjan Roul and Dr Milind Bhoyar worked hard for success of the online programme.

Dr M P Puranik, convener, and Dr R O Ganjiwale, Chairman of the programme, thanked AICTE, New Delhi for providing funds as well as the entire management of Vidardha Youth Welfare Society for providing facilities to conduct the programme.

लोकमत

रविवार ०३.०१.२०२१



## आयपर महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**वर्धा :** औषध निर्माण शास्त्र व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) वर्धा येथे नववर्षाच्या प्रारंभी रासेयोच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिराला प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, आयडीपीचे प्राचार्य डॉ. भूषण साठे, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रयोगशाळा वैज्ञानिक किशोर कोटंबकर, रक्तपेढीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सेलूकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. नीलेश करंडे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. अभिराम देशमुख, विवेक राठोड, एस. पी. देवानी, नीतेश टापरे, सुमित कालते, अमन सुतारकर आदींनी रक्तदान केले. यशस्वितेकरिता महाविद्यालयातील प्रा. साधना गौतम, डॉ. राठी, डॉ. सिंघवी, प्रशांत अनकर, मातकर, शैलेश बुटले आदींनी सहकार्य केले.

लोकमत
शनिवार ०६.०२.२०२१

आय विटनेस

# कोरोना पार्श्वभूमीवर महाविद्यालयाचे निर्जंतुकीकरण...



बोरगाव (मेघे) येथील औषध निर्माणशास्त्र व संशोधन महाविद्यालय १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. त्यासाठी वर्गखोल्यांचे निर्जंतुकीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शासन निर्देशानुसार सर्व निकष पाळून महाविद्यालय सुरू होईल, अशी माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी दिली.

लोकमत
शनिवार ०६.०३.२०२१



## 'आयपर'मध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिन

**वर्धा :** औषधनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) वर्धा येथे राष्ट्रीय सुरक्षा दिन आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी बोरगाव येथील उपकार्यकारी अभियंता चरण गावंडे उपस्थितीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले होते. गंजीवाले यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमाचे उद्दिष्ट नमूद केले, तर प्रमुख अतिथींनी राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त विद्युत सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्युत घरगुती कामासाठी वापरतेवेळी कोणती काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून कुठलीही अनुचित घटना घडणार नाही. याबाबतचे विविध उदाहरणे देऊन विद्युतचा सुरक्षित वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. सुनील देवानी यांनी केले.

The Hitavada
NAGPUR ■ Monday ■ March 22 ■ 2021

# IPER organises webinar

■ **District Correspondent**
WARDHA, Mar 21

ISTE Students Chapter at Institute of Pharmaceutical Education and Research (IPER), Borgaon (Meghe), Wardha had organised a one- day online webinar for faculties and students of B Pharm. and M Pharm. courses. Manish Bhatkar, Founder Director and CEO of Red Lotus Pharmtech Private Limited,Navi Mumbai and Dr Laxma Reddy K, Professor, Department of Chemistry, National Institute of Technology, Warangal, were the main speakers for the webinar.

Bhatkar delivered a talk on 'Elevating Ethical Practices in Pharmaceutical Sciences' and guided students and staff members on how ethical practices should be followed and maintained in pharmaceutical industries. He gave several examples of how peopoe where not following the ethics in professional life which could result into a long term loss.

He interacted with the students and provided them with key knowledge to maintain professional ethics for their overall development in their future.

Dr Laxma Reddy K presented his views to the staff and the students on the topic 'Universal Human Values'. He motivated the students on the basic ideas on what a human actually means and needs. He said that students should recognise how our active participation will strengthen the relationship at our home, in the society and finally with Nature.

The webinar was conducted by S P Dewani, Assistant Professor, under the guidance of Dr R O Ganjiwale, Principal of IPER, Wardha. Dewani also proposed a vote of thanks in which he expressed gratitude towards both the speakers as well as Principal Dr R O Ganjiwale.

लोकमत
शुक्रवार २६.०३.२०२१

# जीपॅट प्रवेश परीक्षेत बोरगावचे 'आयपर' अव्वल

वर्धा : विदर्भ युथ वेलफेअरद्वारा संचालित औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) महाविद्यालयातील १६ विद्यार्थ्यांनी जीपॅट प्रवेश परीक्षा ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण केल्याने आयपर महाविद्यालय अव्वल ठरले आहे. ही प्रवेश परीक्षा केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभाग अंतर्गत नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत घेण्यात येते. प्रवेश परीक्षेत आयपरच्या विशाल वसंत बोरले याने अखिल भारतीय गुणवत्ता यादीत ५७ वा क्रमांक पटकाविला. त्याला ९९.८७ टक्के गुण मिळाले.



वृषाली शंकरराव पथाडे, आदित्य दीपक हजारे, शिवानी गजानन मुत्तेलवार, नंदिनी बिजाराम काळे, ऋतुजा संतोष गावंडे, सोनम त्रंबक डोरले, वैभवी गीरडकर, अंकिता थूल, प्रतीक नक्षिणे, वैष्णवी सतीश राऊत, सोनाली अरविंद ढबाले, नंदिनी माणिक बरवे, ऋतुजा उमेश नवनागे, समीक्षा संजय ददमल, चंद्रकांत चकोले हे उत्तीर्ण झाले. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, युवराजसिंग चौधरी यांनी कौतुक केले.

लोकमत
सोमवार ०५.०४.२०२१

# कोरोना नियंत्रणासाठी आयपरच्या पुढाकाराने चाचण्या

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे) या महाविद्यालयात उन्नत भारत अभियानांतर्गत कोविड विषाणू चाचणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये बोरगाव, इंजापूर, वरूड तसेच दत्तपूर या ग्रामपंचायत क्षेत्रातील रहिवाशांची कोरोनासंबंधी चाचणी करण्यात आली. शिबिरामध्ये रॅपिड अँटिजेन टेस्ट व आरटी-पीसीआर टेस्ट करण्यात आल्या तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्याही टेस्ट करण्यात आल्या.

कार्यक्रमात बोरगाव (मेघे) प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. श्वेता



दीक्षित, श्रीधर सावरकर, हर्षा थोटे, सुचित्रा बोंद्रे, रंजना फुलझेले, छाया देशमुख, माधुरी बाविस्कर उपस्थित होत्या. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. संचालन डॉ. नीलेश करंडे यांनी केले. या शिबिरात ६० नागरिकांकडून नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. यावेळी नागरिकांची तपासणीसाठी गर्दी होती.

लोकमत
epaper.lokmat.com
नागपूर, शुक्रवार, दि. १६ एप्रिल २०२१



जयंती कार्यक्रमाला उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, प्राध्यापक, कर्मचारी.

# आयपरमध्ये डॉ. बाबासाहेबांना केले अभिवादन

वर्धा : बोरगाव (मेघे) येथील औषध निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था या महाविद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले होते. अमरावती येथील शासकीय महाविद्यालयातील औषधीशास्त्र विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर टेंपे प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. गंजीवाले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय संविधान तयार करण्यात मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन केले. डॉ. टेंपे यांनीही डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

THE TIMES OF INDIA, NAGPUR
THURSDAY, JUNE 3, 2021

# Webinar on importance of soft skills in life held

**Institute of Pharmaceutical Education and Research Borgaon Meghe** organised a webinar in which **Sanjay S Uttarwar,** a noted academician and motivational speaker, spoke on the topic **'Importance of soft skills in career'.** The event was live on Google. Students, teachers and eminent personalities attended the webinar. **Prof S P Dewani,** coordinator, introduced speaker and welcomed the guests. **Principal R O Ganjiwale** welcomed the speaker and elaborateed on the importance of the topic in today's scenario. The speaker gave a brief account of the importance of soft skills in career development. **Prof Sameer Sawarkar** was the compere of the talk show. Uttarwar said, "Soft skills are essential to achieve success." Self-confidence is the key to success, he said. He also quoted Walt Disney's four Cs to achieve success —curiosity, confidence, courage and consistency.



लोकमत
रविवार ०९.०५.२०२१

## आयपर येथे पालक सभेचे आयोजन

**वर्धा :** औषधिनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव मेघे येथे ऑनलाईन पालक सभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ओ.गंजीवाले उपस्थित होते. तर प्रा.निलेश डहाके, राजेंद्र बोकडे, किशोर उमाटे, राजेश शेंडे, नेहा क्षिरसागर, विजय पुणेक म्हणून मंचावर उपस्थित होते. संचालन प्रा.अभिराम देशमुख यांनी केले.

लोकमत
शुक्रवार ०६.०८.२०२१

# आयपर महाविद्यालयात वृक्षारोपण

**वर्धा :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीव्दारा संचालित औषधी निर्माण शास्त्र शिक्षक व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) महाविद्यालयात रा.से.यो. तर्फे वृक्षारोपण करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ओ.गंजीवाले डॉ.भुषणकुमार साठे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.ओ.गंजीवाले यांनी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे संचालक रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी डॉ.एन.ए.करंडे यांनी केले.

लोकमत
रविवार २९.०८.२०२१

# आयपरमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** बोरगाव (मेघे) येथे औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन महाविद्यालयात डिजीटल लायबरी अॅन्ड ओव्हरव्हीव या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले उपस्थित होते. या चर्चासत्रात डॉ.आशिष राऊत, डॉ.महेंद्र मेटे यांनी सहभागी होऊन औषध निर्माण शास्त्र अभ्यासक्रमात डिजीटल लायबरीच्या माध्यमातून अभ्यास कसा करायचा यावर मार्गदर्शन केले.

सकाळ | नागपूर, सोमवार, ६ सप्टेंबर २०२१



वर्धा : वृक्षारोपण करताना कर्मचारी.

## आयपरमध्ये माझी वसुंधरा अभियान

**वर्धा :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) या महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाअंतर्गत महाविद्यालय परिसराच्या बाहेर विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये सरू, बोगनवेल, गुलाब, कैलास, फणस, मोसंबी आदीचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गंजीवाले, डॉ. साठे तसेच महाविद्यालयातील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते यामध्ये डॉ. ललित राठी, डॉ. आवारी, अभिराम देशमुख व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत करण्यात आले. संचालन रासेयो अधिकारी निलेश करंडे यांनी केले. डॉ गंजीवाले यांनी वृक्षारोपणाच्या माध्यमातून वातावरणातील ऑक्सिजनची पातळी वाढविता येते व प्रदूषणाला आळा बसतो असे प्रतिपादन याप्रसंगी करण्यात आले. माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत जवळजवळ शंभर वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वृक्षांचे संवर्धन करण्याची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत
रविवार १२.०९.२०२१

## आयपरच्या १३ विद्यार्थ्यांची निवड

**वर्धा :** औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव मेघे येथील १३ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. ऑनलाईन पद्धतीने मुलाखती पार पडल्या. अशी माहिती प्राचार्य डॉ.आर.ओ.गंजीवाले यांनी दिली आहे. निवड झालेल्यांमध्ये प्राची खोडणकर, शिफा शेख, प्रतिक्षा जुमडे, मयुरी देऊळकर, हार्दीक मुपावार, कुणाल बिजवे, रूत्विक सोयीतकर, सत्यम घारपुरे, आरती बुटले, सोनम डवले, शररू पवार, वैष्णवी दरांगे आदींचा समावेश आहे.